पुरुष / Male UTB6835458

तुम्ही थांबाल घराच्या आत!
तरच करता येईल कोरोनावर मात!

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग

**तहसिलदार मलकापूर तथा इंसिडेंट कमांडर, मलकापूर, यांचे कार्यालय**

प्रशासकीय इमारत, तहसिल कार्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा, (म.रा.) पिन 443 101
दूरध्वनी क्रमांक :- 07267-222041 Email ID :- tahsildarmalkapur@gamil.com

क्रमांक : कावि/अका/सानि/845/2020 दिनांक :-24/06/2020

## आदेश

वाचा :- 1) भारतीय साथ रोग अधिनियम-1897
2) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005
3) या कार्यालयाचे आदेश क्र. कावि/नै.आ./542/2020 दिनांक 12/04/2020
4) मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे आदेश क्र. जा.क्र. आव्य/क.लि./कावि-28/2020 दिनांक 28 मे, 2020
5) दिनांक 23/06/2020 रोजीचे सभेत दिलेले निर्देश.

*****

ज्याअर्थी मलकापूर तालुक्यात कोव्हिड -19 रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्याकरीता कोव्हिड-19 चे रुग्णांना ठेवण्याकरीता कोव्हिड केअर सेंटर स्थापन करण्यात आलेले आहेत. मलकापूर शहरातील नगर परिषद, मंगल कार्यालय, मुक्ताई नगर रोड, मलकापूर येथील कोव्हिड केअर सेंटर चे नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. एस.जी. देशपांडे, उप मुख्याधिकारी, नगर परिषद मलकापूर यांचे नियंत्रणाखाली उपरोक्त वाचा मधील 3 नुसार नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच सदयस्थितीत मलकापूर तालुक्यात कोव्हिड-19 रोगाचा प्रादुर्भाव वाढत असून, नगर परिषद, मंगल कार्यालय, मुक्ताई नगर रोड, मलकापूर येथील कोव्हिड केअर सेंटरचे ठिकाणी मलकापूर तालुक्यातील दुर्धर आजार असलेल्या/ वयोवृध्द व्यक्तींची तपासणी करण्यात येणार आहे. त्याकरीता सदर कोव्हिड सेंटर येथील संपूर्ण व्यवस्था पाहणे व दैनंदिन अहवाल सादर करण्यासाठी नियंत्रण अधिकारी यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी, स्वप्नाली डोईफोडे, तहसिलदार तथा Incident Commander, मलकापूर खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची नगर परिषद, मंगल कार्यालय, मुक्ताई नगर रोड, मलकापूर या कोव्हिड केअर सेंटर येथील तपासणी केंद्राचे ठिकाणी नियुक्ती करीत आहे.

| अ. क्र. | कोव्हिड केअर सेंटरचे नाव | नियंत्रण अधिकारी यांचे नाव व हुद्दा | सहायक अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | नगर परिषद मंगल कार्यालय, मुक्ताईनगर रोड, मलकापूर | श्री. एस.जी. देशपांडे, उपमुख्याधिकारी,नगर परिषद, मलकापूर (7350600883) | योगेश घुगे, सहायक भांडारपाल, नगर परिषद, मलकापूर | 8600121300 |
| | | | सुनिल साहेबराव पगारे, कर अधिक्षक, न.प., मलकापूर | 9823260462 |
| | | | कैलास फूलचंद पवार, लिपिक, न. प. मलकापूर | 8554086104 |
| | | | राजेश रामचरण जाझोट, लिपिक, न.प. मलकापूर | 9421469309 |

नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी तात्काळ सदरचे ठिकाणी रुजू होऊन आपला रुजू अहवाल नियंत्रण अधिकारी यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. तसेच उक्त नमूद कोव्हिड केअर सेंटर येथील तपासणी केंद्राचे ठिकाणी उपस्थित राहून नियंत्रण अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज करावे.

यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा टाळाटाळ केल्यास संबधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-2005, भारतीय साथ रोग अधिनियम-1897 व भारतीय दंड संहिता (48 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(स्वप्नाली डोईफोडे)
तहसिलदार तथा
इंसिडेंट कमांडर मलकापूर

Scanned with CamScanner

तयार केलेली यादी

प्रतिलीपी :-

1) मा. जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना माहिती करीता सविनय सादर.
2) मा. जिल्हा शल्य चिकित्सक, बुलडाणा यांना माहितीकरीता सविनय सादर.
3) मा. उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
4) तालुका आरोग्य अधिकारी, मलकापूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
5) वैदयकीय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय, मलकापूर यांना महिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
6) मुख्याधिकारी, नगर परिषद, मलकापूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
7) नियंत्रण अधिकारी, कोव्हिड केअर सेंटर, नगर परिषद, मंगल कार्यालय, मुक्ताई नगर रोड, मलकापूर तथा उप मुख्याधिकारी, नगर परिषद, मलकापूर यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
8) श्री. ----------------------------------------------------------------------------------------------------

यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**तहसिलदार तथा**
**इंसिडेंट कमांडर मलकापूर**

Scanned with CamScanner